प्रेस नोट दिनांक २१/०९/२०२२

| | |
|---|---|
| असीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री. अक्षय शिवगोंड्डा पाटील, वय. ३० वर्षे, तलाठी सजा सुकोंडी ता. दापोली जि. रत्नागिरी सध्या रा. उस्मान बुरोंडकर यांचेकडे भाडयाने, बुरोंडी नाका ता. दापोली जि. रत्नागिरी मुळ रा. मु.पो अब्दुल्लाट ता. शिरोळ जि. कोल्हापुर |
| घटनेचे ठिकाण | दापोली नगरपरिषेदाच्या समोरील रोडवर |
| तक्रार अर्जातील लाचेची रक्कम | १०,०००/-रुपये |
| मागितलेली लाचेची रक्कम | ७०००/- रुपये (तडजोडीअंती) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | स्विकारलेली लाचेची रक्कम ७०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे वडीलांनी मौजे सुकोंडी येथील जमिन तक्रारदार यांचे नावावर करणेबाबत मृत्युपत्र केले होते. सदरची जमिन मृत्युपश्च्यात तक्रारदार यांचे नावावर होणेकरीता तक्रारदार यांनी तलाठी सुकोंडी यांचेकडे अर्ज सादर केला होता. सदरची जमिन त्यांच्या नावावर करुन तसा ७/१२ उतारा देण्याकरीता लोकसेवक श्री. अक्षय पाटील, तलाठी सजा सुकोंडी ता. दापोली यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. अक्षय पाटील यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी येथे दिनांक २१/०९/२०२२ रोजी लाच रक्कमेच्या मागणीची तक्रार दिलेली आहे.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २१/०९/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक श्री. अक्षय पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या वडीलांच्या नावावर असलेली जमिन त्यांचे नावावर करुन सदर जमिनीचा ७/१२ उतारा देण्याकरीता ७०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार तक्रारदार यांचे वडीलांच्या मृत्युपत्रानुसार मौजे सुकोंडी येथील जमिन तक्रारदार यांच्या नावावर करुन जमिनीचा ७/१२ उतारा देण्याकरीता लोकसेवक श्री. अक्षय पाटील यांनी तडजोडीअंती ७,०००/-रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन दिनांक २१/०९/२०२२ रोजी १३.५३ वाजता दापोली नगर परिषदेच्या समोरील रोडवर पंचासमक्ष स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.<br>सदरची सापळा कारवाई श्री. पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर तथा पोलीस अधीक्षक,(अति.कार्य.), ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे, श्री. अनिल घेरडीकर अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे, श्री. सुशांत चव्हाण, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अनंत कांबळे, पोलीस हवालदार संतोष कोळेकर, पोलीस शिपाई हेमंत पवार, राजेश गावकर व चालक पोलीस नाईक प्रशांत कांबळे, ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी यांनी केली आहे. |

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमाकावर संपर्क साधावा

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893, Mobile No. 9823233044, 8055034343,7507417072
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

(अनंत कांबळे)
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी.